# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

## मुं.मे.रे.कॉ.च्या वतीने ३००० झाडांचे मूळ जागी वृक्षारोपण मोहिमेला सुरूवात

**मुंबई, २५ जानेवारी, २०२३ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) च्या वतीने मेट्रो ३ च्या स्थानकांच्या कामाकरता प्रभावित झालेल्या झाडांचे त्यांच्या मूळ जागी वृक्षारोपण करण्याच्या (In-situ plantation) मोहिमेला सिप्झ स्थानकापासून आज सुरुवात झाली. यावेळी मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकिय संचालक श्रीमती अश्विनी भिडे यांच्या हस्ते सिप्झ मेट्रो स्थानकांतील इलेक्ट्रॉनिक्स प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा (ERTL) परिसरात या मोहिमेचा प्रारंभ झाला.**

**मेट्रो-३ मधील २६ स्थानकांच्या बांधकामादरम्यान साधारण ३००० झाडे प्रभावित झाली होती. दरम्यान, उच्च न्यायालयाला दिलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे मुं.मे.रे.कॉ. हे राज्यातील विविध बागांमध्ये १८ इंच परिघ असलेली तितकीच झाडे रुजवत असून मेट्रो स्थानकांच्या त्याच परिसरात मूळ जागी (In-situ) त्याला पुनर्स्थापित करत आहेत. आजच्या वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात वृक्षारोपणातील पॅकेज १९ पासून करण्यात आली असून याअंतर्गत सिप्झ ते धारावीपर्यंतच्या १० स्थानकांचा समावेश होतो. पॅकेज १९ अंतर्गत देशी बदाम, ताम्हण (फुल) आणि पांगारा (फुल) प्रजातींसह १७ स्थानिक प्रजातींची एकूण १०८५ झाडे लावली जातील.**

**'मूळ जागी वृक्षरोपण (In-situ plantation) मोहिमेला सुरूवात करून आपण पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत असल्याचा मला आनंद होत आहे. या मोहिमेंतर्गत पुढील ३ वर्षांमध्ये बागेत रुजवलेली जवळपास ३००० हजार झाडे मेट्रो स्थानकांच्या परिसरात लावून त्यांची तीन वर्ष देखरेख कॉर्पोरेशन द्वारे केली जाणार आहे', असे श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या.**

**यावेळी श्री. अब्दुल मोईद, संचालक, ERTL (पश्चिम), श्री. एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), श्री. ए. ए. भट्ट, संचालक (प्रणाली), श्री. आर. रमणा, कार्यकारी संचालक (नियोजन), श्री. राजीव, कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक), श्री. राजीव कुमार, कार्यकारी संचालक (सिग्नल आणि दूरसंचार), श्री सी. एम. जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य) यांसह मुं.मे.रे.कॉ.चे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. (समाप्त)**